महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१
दू. क्र. ०२०-२६३६२०७१ Website-www.trti.maharashtra.gov.in Email – trti.mah@nic.in

जा.क्र./माहिती तंत्रज्ञान/२०२५-२६/०१/ ३८४ दि:२१/०८/२०२५

## - प्रसिद्धी पत्रक-

**विषय** – नव्याने विकसित केलेले e-Tribe Validity पोर्टल (आदि प्रमाण प्रणाली) प्रायोगिक तत्वावर **अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे (कार्यक्षेत्रातील जिल्हे - पुणे, सातारा,सांगली, सोलापुर, कोल्हापुर)** यांचेकरिता LIVE करण्याबाबत...

**संदर्भ** - १) महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)अधिनियम २००० व नियम, २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीकरिता प्राप्त होणाऱ्या दाव्याबाबत

२) आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्राप्त पत्र क्रमांक:-बैठक-२०२५/प्र.क्र. ०८/का.१० याप्रमाणे दि.०९/०५/२०२५ रोजीचे पत्र

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा या ऑनलाइन उपलब्ध व्हाव्यात हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने अर्जदारांना त्यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करता यावे व त्याबाबतची सद्य:स्थिती तात्काळ अवगत व्हावी याकरीता आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ३०/०४/२०१६ अन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने दि.०१/०५/२०१६ पासून संगणकीकृत ***"आदि प्रमाण प्रणाली"*** द्वारे सुरु करण्यात आलेले आहे. अनुसूचित जमातीच्या दावेदारांना त्यांचे जमातीचे पडताळणीचे अर्ज संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडे e-Tribe (**https://www.etribevalidty.mahaonline.gov.in**) या पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

परंतु उपरोक्त प्रणालीमध्ये काळानुरूप बदल करणे गरजेचे असल्याने व नागरिकांना सुलभ व जलद गतीने ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र मिळणे कामी संदर्भ क्र.२ नुसार या कार्यालयामार्फत नव्याने e -Tribe Validity पोर्टल (https://etribevalidity.trti-maha.in/) विकसित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नव्याने विकसित केलेले e-Tribe Validity पोर्टल (आदि प्रमाण प्रणाली) **प्रायोगिक तत्वावर केवळ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे (कार्यक्षेत्रातील जिल्हे - पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर)** यांचेकरिता दि.२२/०८/२०२५ रोजी पासून LIVE करण्यात येत आहे. तसेच याबाबतची अंतिम तांत्रिक चाचणी झाल्यानंतर उर्वरित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांना सुद्धा LIVE करण्याचे प्रस्तावित आहे.

त्याअनुषंगाने अर्जदार यांनी त्यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव पुणे समिती कार्यालयास e -Tribe Validity पोर्टल द्वारे (https://etribevalidity.trti-maha.in/) सादर करतेवेळी काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास सदर पोर्टलच्या Support Section द्वारे किंवा मो. क्र. ९५२९१५२११४ यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा याची नोंद घ्यावी.

(चंचल पाटील)
प्र. आयुक्त

**प्रत माहिती व कार्यावाहीसाठी ,**

१ मा. सचिव,आदिवासी विकास विभाग,हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग,विस्तार इमारत, पहिला मजला, मंत्रालय,मुंबई – ४०००३२

२ सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे